MHLA050000602019

नियमीत दिवाणी दावा क्र.०७/२०१९
अनुसया वि शासन व इतर.

## नि.क्र. १०९ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११४ आणि क्रम ४७(१) सह वाचन कलम १५१ प्रमाणे दिलेला आहे.

२. वादीचे कथनाप्रमाणे याच प्रकरणातील नि.क्र.१०१ लगतच्या खाली झालेला आदेश या पुनर्विलोकन अर्जान्वये सुधारण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. नि.क्र.१०१ लगचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ४० अन्वये दिला होता. त्यामध्ये वादीचे मयत पती मोहनराव जगताप यांचे सेवानिवृत्तीवेतन जमा करण्यासाठी प्रापकाची नेमणूक व्हावी, म्हणून अर्ज केला होता. वादी हिच पहिली पत्नी असल्याने वस्तुतः ते निवृत्तीवेनत तिला मिळायला हवे. मात्र, प्रतिवादी क्र.५ हिने खोटी, बनावट कागदपत्रे तयार करुन ते निवृत्तीवेतन तिला मिळत आहे. याकामी वादीने पुरावा दिलेला असून वादीच्या साक्षीदारांनी वादी हिच मोहनराव यांची पहिली पत्नी असल्याचे कथन केलेले आहे. याकामी वादीने वाटपपत्रही सादर केले आहे. ज्यामध्ये, सुध्दा मयत मोहनराव जगताप यांनी वादी हीच पहिली पत्नी असल्याचे नमूद केले आहे. तसेच, या प्रकरणातील साक्षीदार बालाजी बिराजदार यांनी ही वादी ही पहिली पत्नी आणि प्रतिवादी क्र.५ ही दुसरी पत्नी असल्याचे कथन केले आहे. नि.क्र.९९ मधील नुतन वाटपपत्राप्रमाणे सुध्दा प्रतिवादींनी ती दुसरी पत्नी असल्याचे मान्य केलेले आहे. मयत मोहनराव यांचे निवृत्तीवेतन चुकीच्या हातात जात असल्याने ते रोखून धरण्यात यावे यासाठी प्रतिवादी क्र.१ यांनी प्रयत्न करायला हवे होते. तसे न केल्याने त्या कामी प्रापक नेमावा अशी विनंती केली. मात्र, वादीचा नि.क्र.१०१ चा अर्ज नामंजूर झाला. त्यातील न्यायालयाच्या निष्कर्षामुळे सदरचा पुनर्विलोकनाचा अर्ज दाखल केला आहे.

**४.** वादीस अर्ज दाखल करण्यासाठीच्या कारणांपैकी पहिले कारण म्हणजे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ४० नियम १ मधील मिळकती किंवा मालमत्ता याबाबत न्यायालयाने योग्य निष्कर्ष नोंदविलेले नाहीत. निवृत्तीवेतन हे सुध्दा मिळकत आहे असे ना. आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाने **जी. मुरलीधर वि. राज्य सरकार आंध्र प्रदेश या रिट याचिका क्र. ४८५१/२०२१** मध्ये नमूद केले आहे. निवृत्तीवेतन आणि वेतन हे दोन्ही कर्मचा-यांची मिळकत आहे असेच त्या निर्णयात न्यायालयाने नमूद केले आहे. त्यामुळे, मालमत्तेबाबत या न्यायालयाने नि.क्र.१०१ च्या आदेशात नोंदविलेले निरीक्षण योग्य नाही असे वादीचे कथन आहे.

**५.** दुसरे कारण जे या अर्जास वादीने नमुद केले आहे ते असे की, न्यायालयाने नि.क्र.१०१ चा अर्ज हा तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर झाल्यानंतर दिला असे निरीक्षण नोंदविलेले आहे. त्यावर आक्षेप घेवून वादीने नि.क्र.५ हा तुर्तातुत ताकीद अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३९ नियम १ व २ अन्वये अचल मालमत्तेबद्दल दाखल केला होता आणि त्यामुळे तो नामंजूर झाला. सदर न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ४० मधील मिळकत या शब्दाचा अर्थ हा कोणत्याही मालमत्तेला लागु होवू शकतो असे विचारात घेतले नाही. याकामी नि.क्र.६७, ८४, आणि ९९ लगत, तसेच नि.क्र.६८ व ८३ लगत आलेला पुरावा विचारात घेता वादी ही प्रथम पत्नी आहे असे सकृतदर्शनी दिसते. त्यामुळे, प्रतिवादी क्र.५ हिला मिळत असलेले निवृत्तीवेतन हे कायद्याचा दुरुपयोग असल्याने ते थांबवावे यासाठी प्रापकाच्या हाती निवृत्तीवेतन जमा व्हावे. नि.क्र.१०१ खालील आदेश चुकीचा असून त्यात सुधारणा, बदल किंवा तो आदेश रद्दबातल होणे आवश्यक आहे.

**६.** वादी ही वयस्कर आणि विविध आजारांनी ग्रस्त व्यक्ती असून प्रतिवादी क्र.५ हिला विनाकारणच निवृत्तीवेतनचा लाभ मिळतो. त्यामुळे, सदर प्रतिवादी प्रकरण लांबविण्याचा सतत प्रयत्न करते. त्याचा परिपाक म्हणून रिट याचिका क्र.३०३१/२०२३ आणि ४७५५/२०२५ या प्रतिवादी क्र.५ ने दाखल केल्या. सदर दोन्ही याचिका फेटाळण्यात

आल्या आहेत. त्यामुळे नि.क्र.१०१ खालील आदेश रद्दबातल किंवा दुरुस्त किंवा बदलला जावा म्हणून विनंती करण्यात आली आहे. अर्जासोबत नि.क्र.११० लगत अनुसयाबाई जगताप या वादीचे शपथपत्र सादर करण्यात आले.

**७.** प्रतिवादी क्र.५ तर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये अर्जातील मजकुर खोटा असून प्रतिवादी क्र.५ ते अमान्य करते असे नमुद करण्यात आले. नि.क्र.१०१ खाली प्रतिवादी क्र.५ ने दिलेले म्हणणे याकामी विचारात घ्यावे. प्रस्तुत अर्जातील कथन टिकणारे नाही म्हणून तो खर्चासह नामंजूर करावा. युक्तीवादादरम्यान प्रतिवादी काही मुद्दे उपस्थित करतील त्याची दखल घ्यावी असे नमुद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती करण्यात आली.

**८.** वादीतर्फे विधीज्ञ डी.ए.साबणे यांनी व प्रतिवादी क्र.५ तर्फे डी.एल.घोगरे यांनी युक्तीवाद केला.

**९.** वादीतर्फे वकिलांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ४० नियम ४७ मधील तरतुदी वाचून दाखवल्या. तसेच, मा.आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाच्या **जी. मुरलीधर वि. आंध्रप्रदेश शासन या रिट याचिका क्र.४८५१/२०२१** मधील परिच्छेद क्र.१० वाचून दाखवला. त्यांच्या कथनांनुसार मालमत्ता ही चल किंवा अचल, तसेच वेतन किंवा निवृत्तीवेनत यापैकी काहीही असू शकते आणि त्यामुळेच नि.क्र.१०१ मध्ये न्यायालयाने मालमत्तेच्या अनुषंगाने नोंदविलेले निष्कर्ष चुकीचे आहेत. या मा.आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या निकालातील निवृत्तीवेतन ही मालमत्ता गृहीत धरुन नि.क्र.१०१ वरील आदेश रद्द व्हावा किंवा त्यात सुधारणा व्हावी असे त्यांनी नमुद केले.

**१०.** प्रतिवादी क्र.५ तर्फे विधीज्ञांनी वादी हे वेगवेगळे अर्ज देवून काल अपव्यय करीत आहेत. अशा कारणासाठी तुर्तातुर्त ताकीद अर्ज रद्द होवून पुन्हा प्रापकाच्या नेमणुकीचा अर्ज दाखल केला व तो नामंजूर झाल्यानंतर पुन्हा पुनर्विलोकनाचा अर्ज दाखल केला. उपरोक्त

अर्ज नामंजूर झाल्यानंतर पुन्हा या स्वरुपाचे अर्ज देणे हे गैर आहे असे नमूद करुन अर्ज रद्द व्हावा अशी विनंती केली.

**११.** सर्व प्रथम वादीने दाखल केलेला प्रस्तुत अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम ४७ नियम १ मधील तरतुदींमध्ये येतो का हे पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करताना वादीने त्यांना १) स्वतःला व्यथित झालेल्या व्यक्ती म्हणून जर वादी समजत असेल आणि जेंव्हा हुकूमनामा किंवा आदेश देण्यात आला त्यावेळी तो तत्परता दाखवून देखील ज्या बाबींची किंवा पुराव्याची माहिती वादीला मिळवता आली नाही त्यामुळे ती बाब किंवा पुरावा त्याला हजर करता आला नाही अशी नवीन आणि महत्त्वाची बाब किंवा पुरावा वादीला आढळून आला नाही तर असा अर्ज दाखल करता येईल किंवा २) अपीलात सकृतदर्शनी दिसणा-या काही चुकीमुळे दोषामुळे असा अर्ज दाखल करता येईल किंवा ३) इतर कोणत्याही परिस्थितीच्या कारणामुळे जर वादीची ईच्छा असेल की त्याच्याविरुध्द देण्यात आलेला हुकूमनाम्याचे किंवा आदेशाचे पुनर्विलोकन करण्यात यावे तर वादी असा अर्ज करु शकेल.

**१२.** प्रापक नेमणुकीच्या अर्जावर न्यायालयाने जो आदेश पारीत केला त्या आदेशाविरुध्द अपील करण्याचा वादीस अधिकार होता व आहे. प्रापक नेमावा किंवा नाही हा पुर्णतः अधिकार न्यायालयाचा आहे. न्यायालय आपल्या मर्जीने प्रापक नेमू शकते किंवा अर्ज नामंजूर करु शकते. वादीने वर नमुद मा.आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाच्या निकालाचा आधार घेवून प्रस्तुत अर्ज दिलेला आहे. मात्र, निकालपत्र वादीने योग्य वाचलेले दिसून येत नाही. त्या निकालासंदर्भात परिच्छेद क्र.१० एवढेच वादीने रेखार्कीत करुन वाचले. मात्र, या न्यायालयाने वरील संदर्भाचे पुर्णतः वाचन केल्यानंतर स्पष्टपणे दिसून आले की, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद क्र.२१ अन्वये दिलेला अधिकार सन्मानाने भोगण्यासाठी अनुच्छेद क्र.३००-अ प्रमाणे मिळकतीचा उपभोग घेण्यासाठी व्यक्तीला अधिकार असतो असे नमुद केले आहे. त्या संदर्भामध्ये शासनाच्या वरिष्ठ सेवक याच्याविरुध्द शिस्त भंग कारवाई

विहित मुदतीत संपवावी असा उच्च न्यायालयाने निर्णय देवूनही ती कारवाई विहित वेळेत न संपल्याने आदेशाने रद्दबातल झाली म्हणून त्या सेवकाने निवृत्ती उपरांत त्याला मिळणा-या वित्तीय भत्ते, निवृत्तीवेतन इत्यादी त्याला मिळावे म्हणून मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका केली होती.

**१३.** त्यात मा.उच्च न्यायालयाने त्याने शासनाच्या केलेल्या सेवेचा मोबदला म्हणून मिळत असलेले वेतन व त्यास भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद क्र.२१ प्रमाणे योग्य प्रकारे व्यतीत होण्यासाठी शासनाचे त्याच्या प्रती असलेले उत्तरदायीत्व म्हणून मिळत असलेले वेतन त्या सेवकाची मालमत्ता आहे असे नमुद केले आहे. अशी मालमत्ता योग्य तो कायदेशीर मार्गाचा वापर केल्याखेरीज उपभोगण्यासाठी अधिकार काढून घेता येवू नये असा मतीतार्थ त्या संदर्भाचा आहे. वेतन किंवा निवृत्तीवेतन हे फक्त आणि फक्त ते मिळण्याचा अधिकार असलेल्या सेवकाची मालमत्ता आहे. त्याच्या मरणोपरांत जी व्यक्ती असे निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असेल त्या व्यक्तीसाठी सदर निवृत्तीवेतन हे त्याच्याकडे चालून आलेला हक्क होय. प्रस्तुत दावा हाच मुळात वादीच्या कथनानुसार वादी ही प्रथम पत्नी आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल होण्यापुर्वीच मयत मोहनराव याचे निवृत्तीवेतन प्रतिवादी क्र.५ यांना मिळत आहे. त्यामुळे, निवृत्तीवेतन प्रापकाकडे जमा करण्यासाठी कोणतेही सबळ कारण वादीने दाखवून न दिल्याने नि.क्र.१०१ हा अर्ज नामंजूर झालेला आहे.

**१४.** सदर वादीने कोणते नवीन तथ्य किंवा पुरावा या प्रकरणी समोर आले की जे मुळ अर्ज चालविताना वादीच्या माहितीत नव्हते, याबद्दल सांगितलेले नाही. या आदेशाविरुध्द अपील करण्यासाठी वादीचा अधिकार न वापरता आणि या प्रकरणी लागू न होणारी मा.उच्च न्यायालय, आंध्रप्रदेश यांच्या निकालावर विसबूंन केलेला प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यास योग्य आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ४७ मधील तरतुदींनूसार विचार करता आणि प्रस्तुत अर्जातील वादीने नमुद केलेले कारण पाहता वादीने या कामातील शाबीत कागदपत्रे आणि

नि.क्र.६७ (दिवाणी दावा क्र.३६/१९८२ मधील जबाबदाव्याची प्रत), नि.क्र.८४ वादी यांनी दाखल केलेले वाटणीपत्र, नि.क्र.९९ वादी यांनी दाखल केलेले सेवा वेतनपत्र, नि.क्र.६८ रे.दि.मु. नं.३६/१९८२ मधील हुकूमनामा, नि.क्र.८३ वादी साक्षीदार क्र.३ बालाजी बिराजदार यांचा जबाब, या कागदपत्रांवर वादी भिस्त ठेवतात. यातील, कोणत्याही कागदपत्रांबाबत ती कागदपत्रे त्यांच्या ताब्यात असूनही वादीने नि.क्र.१०१ वरील अर्जाच्या युक्तीवादामध्ये त्याचा ऊहापोह केला नव्हता. ती कागदपत्रे याच प्रकरणात नि.क्र.१०१ हा अर्ज दाखल होण्यापुर्वीच दाखल केलेली आहेत. त्यावर पुरावा आलेला आहे. सदरचा पुरावा हा अंतीम निर्णयाच्या वेळीचा आहे. तो या घटकेस वापरता येणार नाही याची जाणीव वादीस असावी.

**१५.** प्रस्तुत अर्ज तयार करताना संपरिक्षा न्यायालयाच्या आदेशाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात ज्या पध्दतीने दाद मागताना भाषा वापरली जाते अशा स्वरुपाची भाषा वापरली आहे. त्यातही संपरीक्षा न्यायालयाचा उल्लेख इंग्रजीमध्ये “Trial Court” असा करण्याऐवजी “Trail Court” असा चुकीचा केलेला आहे. प्रस्तुत अर्ज काल अपव्यय करण्यासाठी वादीने दाखल केला आहे. तो रद्द होण्यास पात्र आहे. सबब, आदेश.

**आदेश**

अर्ज नि.क्र.१०९ नामंजूर करण्यात आला.

स्वाक्षरीत/-

**दिनांक २३/०७/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**